# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्रं. 121/2024 दिनांक : 02.04.2024**

## 1)जबरी चोरी :–

**भाग्यनगर** :–दिनांक 25.03.2024 रोजी 02.00 वा. चे सुमारास, **सौरभ बारचे थोडया अंतरावर मालेगाव रोडवर, नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा आपले मित्रास नमुद ठिकणी भेटुन घराकडे पाई–पाई परत जात असताना मोटार सायकलवर एक अनोळखी ईसम वय 25 ते 30 वर्षे वयोगटातील फिर्यादीच्या जवळ येवुन फिर्यादीस म्हणाला की तुम्हाला कोठे जायचे आहे असे विचारले असता तेव्हा फिर्यादीने त्यास मला शेतकरी चौक तरोडा नाका येथे सोडा असे म्हणाला असता त्या अनोळखी ईसमाने तुम्हाला सोडतो असे फिर्यादीस त्याचे मोटार सायकलवर बसविले परंतु फिर्यादीस शेतकरी चौक तरोडा नाका येथे न सोडता दुसऱ्या गल्लीत घेवून गेला व मोटार सायकल थांबविली, त्यानंतर तेथे त्या अनोळखी ईसमाचे दोन साथीदार वय 20 ते 25 वयोगटाचे असे मोटार सायकलवर आले आणि तिघांनी मिळुन फिर्यादीस पैसे व मोबाईल दे असे म्हणाले व त्यापैकी एकाने फिर्यादीजवळ जुना वापरता मोबाईल किंमती 10,000/–रूपयाचा व नगदी 2000/–रूपये असा एकुण किंमती 12,000/–रूपयाचा माल संगणमत करून जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सोपान संभाजी सावते, वय 44 वर्षे, व्यवसाय व्यापार व मत्सशेती रा. मालेगाव रोड, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 134/2024 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/989 मामुलवार**, हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)धर्माबाद :–** दिनांक 30.03.2024 ते दिनांक 31.03.2024 रोजी 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर आंध्र बस स्टॅन्ड धर्माबाद नांदेड येथे**, यातील फिर्यादीची होंडा युनिकार्न कंपणीची मोटार सायकल क्रमांक एमएच–14/एचएक्स–2769 किंमती 75,000/– रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी बाळु यादव संपाळ, वय 32 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. मुगळी ता. निलंगा जि. लातुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 84/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1928 स्वामी, मो.क्रं. 7975769508** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 31.03.2024 रोजी 22.30 वा. ते दिनांक 01.04.2024 रोजी 07.00 वा. चे दरम्यान,**मयुर टॉकीज जवळ नाईकनगर, नांदेड येथे**, यातील फिर्यादीची होंडा युनिकार्न कंपणीची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/एझेड–3880 किंमती 25,000/– रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली.वगैरे **फिर्यादी नारायण दत्तराम मोरे, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा. स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 98/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2191 चिंतोरे, मो.क्रं. 9075378367** हे करीत आहेत.

**3)वजिराबाद :–** दिनांक 29.03.2024 रोजी 09.45 वा. ते 13.45 वा. चे दरम्यान, **जिल्हा परिषद च्या कार्यालय, नांदेड येथे**, यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपणीची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/एए–5533 किंमती 25,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर पितांबर गिरी, वय 43 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. लोहार गल्ली जुना मोंढा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 157/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1774 एमेकर, मो.क्रं. 8482883304** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**1)कंधार** :–दिनांक 29.03.2024 रोजी 20.45 वा. चे सुमारास, **पेठवडज ते पाडुर्णा जाणारे रोडवर गणपती गडमड यांचे शेताजवळ ता. कंधार जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा मुख्य बॅक इंडसलॅन्डं बॅक शाखा भारत फायन्ससियल इनक्लुजन ता. मुखेड शाखेची वरवंट या गावी वसुली करून परत मुखेडकडे मोटार सायकल वर जात असताना रस्त्यात लघुशंका आल्याने मो.सा. थांबवुन बाजुला लघुशंका करीत असताना कोणीतरी अज्ञात तिन व्यक्ती मोटार सायकलवर संगणमत करून येवून फिर्यादीचे मोटार सायकलला अडकवून ठेवलेल्या बॅगचे पॉकेट मध्ये ठेवलेले नगदी 12,962/–रूपये चोरून नेले. वगैरे **फिर्यादी यशवंत लक्ष्मण चावरे, वय 22 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. काटकळंबा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 107/2024 कलम 379,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1265 गिते**, हे करीत आहेत.

**2)वजिराबाद** :–दिनांक 01.04.2024 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **बसस्थानक, नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई ही तिच्या दादाजी सोबत नांदेड येथुन निजामाबाद येथे जाण्यासाठी बसस्थानक येथे आली तेथे तिच्या मुलाला दुध पाजण्यासाठी तिच्या पर्समधुन दुधाची बॉटल बाहेर काढली व पर्सची चैन उघडी ठेवली व मुलाला दुध पाजुन झाल्यावर दुधाची बॉटल पर्समध्ये ठेवण्यासाठी पाहीले असता त्यातील डायमंड ओमामेन्टस पेंडेट ढाई ग्राम, डायमंड ओमामेन्ट इअर रिंग्स ढाई ग्राम, गोल्ड चैन तिन ग्राम असे एकुण किंमती 65,000/– रूपयाचे दागीने दिसले नाही दागीने कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मुस्कान समिर अहेमदखान, वय 24 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. इराणी गल्ली हैद्राबाद राज्य तेलंगाना** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 158/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2617 मुरमुरे,** हे करीत आहेत.

## 4)अवैध रेती चोरी :–

**अर्धापूर** :– दिनांक 31.03.2024 रोजी 23.20 वा. चे सुमारास, **येळेगाव साखर कारखाना समोरील रोडवर समोरील रोडवर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील टिपर क्रंमाक एम.एच.–20/ए.टी.–8447 किंमती 6,10,000/–रूपयाचे चालक व मालक यांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या दोन ब्रास वाळु किंमती 12,000/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम चे उल्लंघन केले व शासकीय कामात अटकाव केला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री चंद्रशेखर आनंदाव कदम, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 160/2024 कलम 379,186,34 भादवी कायदा सह कलम 48(7), 48(8) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2215 पाटील, मो.क्रं. 9322857773** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**1)मुक्रामाबाद** :–दिनांक 25.03.2024 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीच्या घरा समोर मौजे इटग्याळ, प.मु. ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस जुन्या भांडणाचे कारणावरून यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून हातातील काठीने फिर्यादीचे डोक्यात मारून डोके फोडुन गंभीर जखमी केले व उजवे हाताचे बोट काठी मारून फॅक्चर केले व थापड बुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली व गंभीर दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी भास्कर किशन गायकवाड, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. इटग्याळ प.मु. ता. मुखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 64/2024 कलम 326,324,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2000 सुरनर, मो. नं. 9130731840** हे करीत आहेत.

**2)लोहा** :–दिनांक 31.03.2024 रोजी 02.30 वा. चे सुमारास, **लोहा ते नांदेड रोड लगत जनाई धाब्यासमोर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा जनाई धाबा येथे पाणी पिण्यासाठी गेली असता आरोपी डोळे वटारून पाहु लागल्याने फिर्यादीने आरोपीतांना डोळे वटारून का पाहत आहेस असे म्हणाला असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून लाकडी पाटीने डोळयावर मारून गंभीर दुखापत केली व कोल्ड्रींगची काचेची बॉटल कपाळावर मारून दुखापत केली व तोंडावर बुक्यांनी मारहाण केल्याने समोरील दोन दात हातल आहेत तसेच थापड बुक्याने मारहाण करून शिवीगाळ केली व गंभीर दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी तिरूपती विठ्ठल डिकळे, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. पारडी ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 109/2024 कलम 326,324,323,504 ,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2000 सुरनर, मो. नं. 9130731840** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 31.03.2024 रोजी 20.40 वा. चे सुमारास, **वाजेगाव बायपास रोडवरील ब्रिजखाली वाजेगाव शिवार, नांदेड येथे,** यातील नमुद तिन आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या एक अग्निशस्त्र गावठी पिस्टल मॅगझीन सह विक्री करण्याचे उद्देशाने सोबत 11 मोबाईल असा एकुण किंमती 1,68,000/–रूपयाचे मुद्देमाल आपले ताब्यात बाळगलेले मिळुन आले.वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/492 संतोष रघुनाथ जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 270/2024 कलम 3/25,7/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री गढवे, मो.क्रं. 9325787605** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)कंधार :–** दिनांक 01.04.2024 रोजी 14.45 वा. चे सुमारास, **पान टपरी समोर रोडवर भोले नगर मौजे पेठवडज ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे व कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना एकुण किमंती 2110/–रूपयाचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/529 तुकाराम माधवराव जुने, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 109/2024 कलम 12(अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1265 गीते,** हे करीत आहेत.

**2)कंधार :–** दिनांक 01.04.2024 रोजी 15.55 वा. चे सुमारास, लक्ष्मण मोघलाजी शिराढोणे यांचे घराजवळ बाभळीच्या झाडाखाली मौजे पेठवडज **ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिरट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व दोन मोटार सायकल व दोन लुना असा एकुण किमंती 1,57,500/–रूपयाचे मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/529 तुकाराम माधवराव जुने, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 110/2024 कलम 12(अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1265 गीते,** हे करीत आहेत.

**3)अर्धापुर :–** दिनांक 01.04.2024 रोजी 19.15 वा. चे सुमारास, कामठा ते गणपुर रोडलगत मोकळया जागेत **ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन नाईट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना एकुण किमंती 4060/–रूपयाचे मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2264 गंगाराम हनमंतराव जाधव, ने. पोस्टे स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 165/2024 कलम 12(अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2803 चाटे मो.नं.9673111588,** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 01.04.2024 रोजी 17.50 वा. चे सुमारास, देगाव **पाटी येथील स्वराज्य धाब्याच्या बाजुला अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी किंमती 3360/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2264 गंगाराम हनमंतराव जाधव, ने. पोस्टे स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 164/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1279 श्री येमेकर, मो.नं. 9923670999** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद :–** दिनांक 01.04.2024 रोजी 18.50 वा. चे सुमारास, **मौ. रावणकोळा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद महिला आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 7000/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/346 गजानन मारोती ढगे, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 65/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2068 कागणे, मो.नं. 8459537419** हे करीत आहेत.

**3)मरखेल :–** दिनांक 01.04.2024 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **मौ. झरी ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 1540/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/13 सचिन चंद्रकांत गीरे, ने. पोस्टे मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 65/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 शेख, मो.नं. 7776067774** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड